मुंबई, सोमवार, २४ जुलै २०२३ | वर्ष : ३५ अंक : १८१ | पृष्ठे १० | मूल्य : ५.०० रुपये | ★★ शहर आवृत्ती
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

# २१ वर्षांनी झाली मनोरुग्णाची कुटुंबीयांबरोबर पुनर्भेट

## श्रद्धा फाऊंडेशन बनली हिंदुस्थान-बांगलादेशमधील दुवा

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - कर्जतच्या रस्त्यावर सापडलेल्या बांगलादेशी मनोरुग्णाला उपचारानंतर पुन्हा २१ वर्षांनंतर मायदेशी पाठवून कुटुंबीयांचे पुनर्मिलन घडवण्याचे काम मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भारत वाटवानी यांच्या श्रद्धा फाऊंडेशनने केले आहे. मनोरुग्णांसाठी तळमळीने काम करणारी फाऊंडेशन दोन्ही देशांमधील मानवी दुवा बनली.

डॉ. भारत वाटवानी यांच्या श्रद्धा फाऊंडेशनकडून रस्त्यावर भटकणार्या मनोरुग्णांची सेवा करून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले जातात. आतापर्यंत १० हजारांहून अधिक रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. चार वर्षांपूर्वी कर्जतच्या रस्त्यावर फाऊंडेशनच्या आरोग्यदूतांना मोहम्मद रेहमान ऊर्फ मोती सापडला. त्याला केंद्रात आणून वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले. मात्र, त्याला काहीही नीट सांगता येत नव्हते. त्याची बंगाली भाषाही कोणाला नीट कळत नव्हती. गिरीश कुलकर्णी यांच्या स्नेहालय संस्थेच्यावतीने बांगलादेशात आयोजित केलेल्या रॅलीत काही आरोग्यदूत गेले होते. बांगलादेशातील काही विद्यार्थ्यांना हिंदुस्थानात आमंत्रित करण्यात आले. यावेळी या बंगाली विद्यार्थ्यांच्या मदतीने व्हिडिओ कॉल करून त्याच्या पालकांचा शोध सुरू करण्यात आला. त्यावेळी हा रुग्ण बांगलादेशातला असल्याचे निष्पन्न झाले. या विद्यार्थ्यांनी मायदेशी परतून तिथे मोतीच्या पालकांचा शोध घेतला.

### स्क्रिझोफ्रेनिया आजाराने त्रस्त

बांगलादेशातून २००२ साली गायब झालेला हा रुग्ण सीमा ओलांडून हिंदुस्थानात कसा आला ते एक मोठे गूढ आहे. मात्र, स्क्रिझोफ्रेनिया आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णावर उपचार करून त्याला पुन्हा मायदेशात त्यांच्या कुटुंबीयांकडे पाठवण्याचे शिवधनुष्य श्रद्धा फाऊंडेशनने समर्थपणे पेलवले.



### लष्करी कर्मचाऱ्याचा मुलगा

मोतीचे वडील बांगलादेशी लष्करातून निवृत्त कर्मचारी असून त्यांच्याशी संपर्क झाल्यावर कागदोपत्री कार्यवाही वेगाने सुरू झाली. २७ जूनला हिंदुस्थान-बांगलादेश सीमेवर फाऊंडेशनच्या मनोरुग्णतज्ज्ञ डॉ. स्वराली कोंडविलकर आणि नितीश शर्मा या व्यक्तीला घेऊन गेले. मात्र, देशाबाहेर लागणारा परवाना नसल्यामुळे त्याला घेऊन पुन्हा मुंबईला यावे लागले. रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलीस विभाग, सहप्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी अधिकार्यांनी केलेल्या सहकार्यामुळे परवान्याची प्रक्रिया वेगाने झाली आणि मोतीला २१ वर्षांनी पुन्हा आपल्या कुटुंबीयांना भेटता आले.